प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CIDCO
WE MAKE CITIES
सिडको
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: mohan.ninawe@gmail.com

**दि. २१ फेब्रुवारी २०१९**

# सिडकोतर्फे साकारला जाणार खारघर-बेलापूर सागरी मार्ग

नवी मुंबईतील दळणवळण यंत्रणेमार्फत नागरिकांना प्रवासाच्या उत्तम सोयी-सुविधा प्राप्त व्हाव्यात यासाठी सिडको महामंडळ नेहमीच प्रयत्नशील राहिले आहे. सिडकोतर्फे साकारण्यात येत असलेला खारघर-बेलापूर सागरी मार्ग यातीलच पुढचा महत्वपूर्ण टप्पा आहे. ९.५ कि.मी. लांबीचा हा सागरी मार्ग विकसित करण्यात येणार असून त्यासाठी सिडको महामंडळास अंदाजे रू. २७२.६४ कोटी खर्च अपेक्षित आहे.

सागरी मार्गाचा पहिला भाग खारघर, जलमार्ग, सेक्टर १६ ते सीबीडी बेलापूर, सेक्टर ११ पर्यंत विकसित करणे प्रस्तावित आहे. तर दुसरा भाग सीबीडी बेलापूर, सेक्टर १५ ते नेरूळ येथील जल वाहतूक टर्मिनलपर्यंत विकसित केला जाणार आहे. एकूण ९.५ कि.मी. लांबीच्या सागरी मार्गाचा प्रथम भाग ५ कि.मी. चा असून या भागात सायन-पनवेल महामार्गावर पूलदेखील बांधण्यात येणार आहे. सदर रस्ता व पुलाची रूंदी ३० मी. असणार आहे. उर्वरित रस्ता ४.५० कि.मी. चा असून त्यातील १८७४.०० मी. रस्त्याचा विकास दुसऱ्या भागात करण्यात येणार आहे. दुसऱ्या भागातील १८७४.०० मी. चा रस्ता वगळता उर्वरित रस्त्याचा विकास यापूर्वीच करण्यात आलेला आहे.

नवी मुंबईतील रायगड जिल्ह्यातील खारघर, कामोठे, नवीन पनवेल, उलवे व द्रोणागिरी या नोड्समधील विविध प्रकल्पांचा विकास सिडकोमार्फत करण्यात येत आहे. यातील केवळ खारघरमध्येच सिडकोतर्फे अनेक गृहनिर्माण योजना, कॉर्पोरेट पार्क, मेट्रो यांसारखे महत्वाकांक्षी प्रकल्प साकारण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे सिडकोने सेंट्रल पार्क व गोल्फ कोर्ससारखे आयकॉनिक प्रकल्प खारघरमध्ये साकारले आहेत. अशा परिपूर्ण खारघर नोडमध्ये प्रवेश करण्यासाठी प्रवेश मार्ग व कोपरा गाव असे केवळ दोनच ‘एन्ट्री पॉईंट्स’ आहेत. परंतु या ठिकाणीदेखील वाहतूक कोंडीची समस्या मोठ्या प्रमाणावर जाणवू लागली आहे. यासाठी पर्यायी मार्गाची व्यवस्था करणे अत्यावश्यक होते.

दिनांक १८ फेब्रुवारी २०१९ रोजी सिडकोच्या संचालक मंडळाच्या बैठकीत सागरी मार्गाचा विकास करण्यासाठीच्या प्रस्तावास मंजूरी देण्यात आली असून या सागरी मार्गाच्या विकासासाठी लवकरच निविदा प्रक्रीयादेखील सुरू करण्यात येणार आहे.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,

वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

वरिष्ठ जनसंपर्क अधिकारी, सिडको